आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# मासिक ई-मॅगझीन

MAY 2026

## महिना : मे २०२६

महाविद्यालयात
आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,
क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे
मासिक ई-मॅगझीन.










No : 1234567890000000000

दयानंद शिक्षण संस्था, लातूर

आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# मासिक ई-मॅगझीन

AUGUST 2026

## महिना : ऑगस्ट २०२६

महाविद्यालयात
आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,
क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे
मासिक ई-मॅगझीन.










No : 1234567890000000000






# शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेची नवी क्रांती" --- डॉ. वर्षा देसाई

लातूर : महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूरच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत "ई- कन्टेंट डेव्हल्पमेन्ट ॲण्ड एआय इन एज्युकेशन" या विषयावर पाच दिवसीय अध्यापक विकास कार्यक्रम (Faculty Development Programme – FDP) आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन डी. वाय. पाटील विद्यापीठ, तळसंदे, कोल्हापूर येथील संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. वर्षा देसाई यांच्या शुभ हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. वर्षा देसाई यांनी आजच्या डिजिटल युगात प्राध्यापकानी ई-कंटेंट निर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून अध्यापन अधिक विद्यार्थी-केंद्रित, संवादात्मक आणि परिणामकारक बनविण्याची गरज अधोरेखित केली. कृत्रिम बुद्धिमत्ता ही शिक्षकांची जागा घेणारी नसून अध्यापन अधिक प्रभावी करणारी सहायक तंत्रज्ञान प्रणाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच गुणवत्तापूर्ण ई-कंटेंट तयार करण्यासाठी विविध डिजिटल साधने, एआय-आधारित प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक नवोपक्रम यांची माहिती त्यांनी सहभागी प्राध्यापकांना दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांनी डिजिटल कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. अशा प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम अध्यापनातील गुणवत्ता वाढविण्यास आणि विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देण्यास उपयुक्त ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. MSFDA च्या वतीने एआय वर फक्त कला महाविद्यालयातील प्राध्यापकासाठी पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केलेले महाराष्ट्रातील कदाचित एकमेव महाविद्यालय असेल अशी भावना व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे येथील नवनिर्मिती आणि अद्यावत तंत्रज्ञानाच्या सहाय्यक प्रीतम दरेकर यांनी प्रास्ताविक व उद्देश स्पष्ट करताना कार्यक्रमाची रूपरेषा आणि पाच दिवसांत होणाऱ्या विविध तांत्रिक सत्रांची माहिती दिली. या प्रशिक्षणामध्ये ई-कंटेंट निर्मिती, जनरेटिव्ह एआय, अध्यापनातील एआय साधनांचा वापर, डिजिटल मूल्यांकन आणि शैक्षणिक तंत्रज्ञान या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन IQAC संचालक डॉ. संतोष पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. कल्पना कदम यांनी मांडले.






# यंत्र हे मानवाची जागा घेऊ शकत नाही : मा. श्री. रमेश बियाणी

महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी (MSFDA), पुणे आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "ई-कंन्टेंट डेव्हलपमेन्ट ॲण्ड एआय इन इज्युकेशन" या पाच दिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमात मार्गदर्शन करताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांनी सांगितले की, "यंत्र हे मानवाची जागा घेऊ शकत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही शिक्षण, संशोधन आणि प्रशासनासाठी प्रभावी सहाय्यक ठरू शकते; मात्र मानवी विचारशक्ती, सर्जनशीलता, नैतिक मूल्ये आणि निर्णयक्षमता यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही." ते पुढे म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात शिक्षकांनी AI चा योग्य आणि जबाबदारीने वापर करून अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक आणि विद्यार्थी-केंद्रित करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे शिक्षकाचे पर्याय नसून त्यांचे सामर्थ्य वाढविणारे साधन आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे सहाय्यक साधन आहे. मानवी सर्जनशीलता, मूल्ये आणि संवेदनशीलता कायम महत्त्वाची आहे. असे सांगून सर्व सहभागी प्राध्यापकांचे विशेष कौतुक केले. दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता ही शिक्षकांची प्रतिस्पर्धी नसून प्रभावी सहकारी आहेत असे प्रतिपादन करून सदरील कार्यक्रमात ई-कंटेंट निर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल अध्यापन आणि आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यावर सविस्तर मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील संगणकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कबीर खराडे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि ई-कंटेंट निर्मितीमुळे उच्च शिक्षण अधिक प्रभावी, संवादात्मक आणि भविष्योन्मुख होत असल्याचे प्रतिपादन केले. उपस्थित प्राध्यापकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. पशांत दिक्षीत व एम.एस.एफ.डी.ए. पुणे यांच्या समन्वयक प्रितम दरेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. राजू मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन IQAC समन्वयक डॉ. संतोष पाटील, तसेच विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.











# दयानंद कला महाविद्यालयाचा 'नशा मुक्त भारत अभियान 2026'मध्ये दबदबा; पाच स्पर्धांत प्रथम, मुंबईतील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

माय भारत - लातूर व दयानंद कला महाविद्यालय, लातूर (रा. से. यो.) यांच्या संयुक्त विद्यमाने युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली "नशा मुक्त भारत अभियान २०२६" अंतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या अभियानांतर्गत 'मेरा युवा भारत' कार्यालयाच्या वतीने म्युझिक, डान्स, रील मेकिंग व शॉर्ट फिल्म, नुक्कड नाटक, वादविवाद व वक्तृत्व, चित्रकला आणि घोषवाक्य लेखन अशा विविध आठ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दयानंद कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सक्रीय पुढाकार घेत या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन अत्यंत यशस्वीरीत्या पार पाडले.

मेरा युवा भारततर्फे आयोजित या सर्व स्पर्धांमध्ये दयानंद कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कलाविष्कार सादर करत आठ पैकी तब्बल पाच स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले. प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक लातूरचे पोलीस निरीक्षक दयानंद पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी दयानंद शिक्षण संस्थेच्या कार्याचा गौरव करत सांगितले की, उत्तेजक पदार्थांपासून दूर राहणे ही काळाची गरज आहे, कारण व्यसनाधीनता हीच गुन्हेगारीची पहिली पायरी ठरते. तसेच इंटरनेट आणि सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून देताना तरुणांनी अंमली पदार्थांचे जाळे आणि डिजिटल धोक्यांपासून सावध राहून आपले भविष्य सुरक्षित ठेवावे, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड यांनी मनोगत व्यक्त करताना स्पष्ट केले की, २०४७ च्या 'विकसित भारता'चे स्वप्न साकार करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज मनुष्यबळ आवश्यक आहे. देशात व्यसनाधीनता पसरवणाऱ्या घटकांविरुद्ध भारत सरकार कटिबद्ध असून पथनाट्य, गीते व घोषणांद्वारे समाजात व्यापक जाणीवजागृती केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांनी "व्यसनमुक्त युवक हाच विकसित भारताचा पाया आहे," असा प्रेरणादायी संदेश दिला. युवाशक्ती ही देशाची खरी ऊर्जा असून विद्यार्थ्यांनी अभ्यास, क्रीडा आणि सामाजिक उपक्रमांतून आपले व्यक्तिमत्त्व घडवावे, असे प्रतिपादन त्यांनी केले. व्यसनमुक्त, सुदृढ आणि तंत्रस्नेही समाज निर्माण करण्यासाठी दयानंद शिक्षण संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठाम उभी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'मेरा युवा भारत' लातूरचे समन्वयक प्रा. प्रशांत साबणे यांनी प्रास्ताविक करताना 'मेरा युवा भारत' अंतर्गत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली आणि तरुणांनी या व्यासपीठाचा वापर करून राष्ट्र उभारणीत सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

या प्रसंगी व्यासपीठावर एक्सपर्ट अकॅडमीचे प्रा. आकाश सावंत, प्रा. बाळासाहेब बावणे, उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वी संयोजनासाठी आणि अंमलबजावणीसाठी दयानंद कला महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने विशेष पुढाकार घेतला. रासेयोचे विभागीय समन्वयक डॉ. संदीपान जगदाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिल भुरे, प्रा. सिद्धार्थ भालेराव, डॉ. गोपाल बाहेती आणि प्रा. मंगेश चिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्यास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, रा.से.यो. स्वयंसेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दयानंद शिक्षण संस्थेत साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा .श्री. लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव मा .श्री. रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली, दयानंद शिक्षण संस्थेत साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित आणि कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी प्रमुख वक्ते प्रा. दशरथ ननवरे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर व साहित्यावर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांचे मराठी साहित्यातील स्थान अत्यंत अग्रगण्य आहे. त्यांनी कथा, कादंबऱ्या, कविता, प्रवासवर्णने, छक्कड, पोवाडे आणि नाटके यांसारख्या विविध प्रकारांतून समृद्ध लेखन केले. गावकुसाबाहेरील शोषित, पीडित समाजाचे दुःखाश्रू आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला आपल्या साहित्यातून वाचा फोडण्याचे महान कार्य त्यांनी केले.

पुढे बोलताना प्रा. दशरथ ननवरे म्हणाले की, स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्धही अण्णाभाऊंनी अत्यंत प्रभावी लेखन केले असून, त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्त्री व्यक्तिरेखांना महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. त्यांच्या साहित्यातील स्त्री ही परिस्थितीनुसार नाजूक असण्यासोबतच कणखर आणि संघर्षशील दिसते, तर त्यांचा नायक समाजात होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्वेषाने प्रहार करणारा बलदंड पुरुष आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये आपल्या शाहिरी काव्याच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राला संघटित करण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याला केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही मान्यता मिळाली. १९६१ मध्ये त्यांनी रशियाचा दौरा केला, जिथे त्यांनी शिवचरित्र पोवाड्याच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे मांडले. त्यांच्या साहित्याचे रशियन भाषेत भाषांतरही झाले आहे. त्यांची 'फकिरा' ही कादंबरी मराठी साहित्यात मैलाचा दगड ठरली असून, तिच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या व तिला आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रचंड प्रसिद्धी मिळाली. १९५० ते १९६२ हा अण्णाभाऊंच्या साहित्यिक प्रवासातील सुवर्णकाळ मानला जातो. जातिव्यवस्था, धार्मिक अवडंबर, आर्थिक शोषण आणि सामाजिक विषमतेविरुद्ध त्यांची लेखणी सातत्याने चालली असून, त्यांच्या साहित्याचा मुख्य केंद्रबिंदू 'माणूस आणि त्याचा सन्मान' हाच होता. शेवटी प्रतिपादन करताना प्रा. दशरथ ननवरे यांनी स्पष्ट केले की, अण्णाभाऊंनी आपल्या समृद्ध अनुभवांच्या आणि अलौकिक प्रतिभेच्या बळावर मराठी साहित्यविश्व समृद्ध केले. म्हणूनच 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ लेखनाचा उत्सव न राहता वंचितांच्या जीवनाचे वास्तव समजून घेण्याचा, सामाजिक प्रश्नांवर संवेदनशीलपणे लिहिण्याचा आणि परिवर्तनवादी साहित्यनिर्मितीची प्रेरणा घेण्याचा दिवस ठरावा. त्यांच्या साहित्याचे वाचन, चिंतन आणि अनुकरण करून नव्या पिढीने लेखनाची प्रेरणा घ्यावी आणि आपल्या लेखणीतून सामाजिक परिवर्तनाचा विचार पुढे न्यावा, हाच या दिवसाचा खरा हेतू आहे.

# डॉ.नागरगोजे यांनी मातोश्रींच्या स्मृती जपल्या शिक्षणाच्या मदतीतून; 21 मुलींच्या शिक्षणासाठी 21 हजारांची मदत”



दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांच्या मातोश्री स्वर्गीय चंपाबाई नामदेव नागरगोजे यांचे मौजे महाळंग्रावाडी येथे वृद्धापकाळाने दि. १४ जुलै २०२० रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या तिथीनुसार सहाव्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी पारंपरिक पद्धतीने पूजन करून स्मरण करण्यात आले.

पुण्यतिथीनिमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देत डॉ. दिलीप नागरगोजे, त्यांच्या पत्नी सौ. रेश्मा नागरगोजे आणि चिरंजीव श्रीनिवास व ओम यांनी दयानंद कला महाविद्यालयातील इयत्ता अकरावी व बारावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या गरजू व होतकरू २१ विद्यार्थिनींचे वार्षिक शैक्षणिक शुल्क २१ हजार रुपये भरून आगळ्या-वेगळ्या पद्धतीने मातोश्रींची पुण्यतिथी साजरी केली.

२१ विद्यार्थिनींच्या शैक्षणिक शुल्काची २१ हजार रुपयांची रक्कम दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, अधीक्षक श्री. संजय व्यास, श्री. विकास खोगरे आदी उपस्थित होते.

विशेष म्हणजे, डॉ. नागरगोजे कुटुंबीयांनी यापूर्वीही अशाच प्रकारे विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी मदत केली असून आतापर्यंत एकूण १२६ विद्यार्थिनींचे शैक्षणिक शुल्क भरले आहे.

‘पुण्यतिथी म्हणजे केवळ स्मरण नव्हे, तर त्यांच्या संस्कारांना समाजोपयोगी कृतीतून जिवंत ठेवणे’ या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थिनींच्या शिक्षणात अडथळा येऊ नये आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

पुण्यतिथीचा खर्च समाजोपयोगी कार्यासाठी देऊन डॉ. दिलीप नागरगोजे व त्यांच्या कुटुंबीयांनी ‘शिक्षणासाठी मदत हीच खरी श्रद्धांजली’ हा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. त्यांच्या या प्रेरणादायी उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, समाजात एक नवा आदर्श आणि सकारात्मक पायंडा निर्माण केल्याची भावना व्यक्त होत आहे.

# "कायद्याचे पालन ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी" - न्यायमूर्ती अभय ओक






कायद्याचे पालन करणे हे केवळ कायदेशीर बंधन नाही, तर ती प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय ओक यांनी केले. दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विधी महाविद्यालयाच्या नवीन सेमिनार हॉलच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी बोलताना न्यायमूर्ती ओक म्हणाले, "भारतीय राज्यघटनेने आपल्याला अनेक अधिकार दिले आहेत. पण अधिकारांसोबत कर्तव्येही दिली आहेत. आपल्या अधिकारसोबतच आपण आपली कर्तव्ये पार पाडतो का, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.

संविधान हा केवळ ग्रंथ नसून आपली जीवनशैली आहे. संविधान टिकवायचे असेल तर कायद्याचा आदर आणि पालन हाच एकमेव मार्ग आहे असेही त्यांनी स्पष्ट केले. सेमिनार हॉलच्या उद्घाटनाने विद्यार्थ्यांना संवाद, चर्चासत्र आणि कायदेशीर चर्चांसाठी एक नवे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. असेही त्यांनी सांगितले. कारण वकील म्हणजे केवळ न्यायालयात युक्तिवाद करणारा नाही. तर तो समाजात न्याय आणि कायद्याचे भान जागवणारा सेतू आहे.

यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीचे महत्व अधोरेखित करताना वकिली व्यवसायासाठी आवश्यक प्रात्यक्षिक शिक्षणावर भर देण्याचे आवाहन केले.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबईचे अध्यक्ष व मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश मंगेश पाटील यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांने बोलायला का शिकले पाहिजे यावर भर दिला. कारण वकिली व्यवसायात संभाषण कौशल्य आवश्यक आहे.

महाविद्यालय विकास समितीचे ॲड. आशिष बाजपाई यांनी आपल्या मनोगतामध्ये ज्येष्ठ वकील बी. व्ही. कंकाळ यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करून महाविद्यालयाचा भक्कम पाया रोवण्यात त्यांची भूमिका विशद केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पूनम नाथानी यांनी महाविद्यालयाच्या विकासात शिक्षण संस्थेचे योगदान अमूल्य असून जे जे नवे ते आपल्या महाविद्यालयाला हवे या संकल्पनेतून आज अत्याधुनिक सेमिनार हॉलची निर्मिती झाली आहे हे सांगितले. महाविद्यालयातील सर्व अभ्यासक्रम आणि त्याला पूरक साधन सामुग्री उपलब्ध करून देण्यात संस्था नेहमी पाठीशी उभी आहे. त्यामुळेच गुणवंत विद्यार्थी तयार होत आहेत.

यावेळी दयानंद विधी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी माजी प्रमुख जिल्हा न्यायाधीश आर वाय शेख, न्यायाधीश अभय शिरशीकर,न्यायाधीश विकास कुलकर्णी, न्यायाधीश वेदपाठक जे, न्यायाधीश जोशी जे के, न्यायाधीश कुरेशी ए आर, न्यायाधीश एस डी जगताप, न्यायाधीश इंद्राळे व्ही जी, न्यायाधीश प्रदीप शिंदे यांचे सत्कार करण्यात आले.

व्यासपीठावर दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी हे होते, उपाध्यक्ष श्री. ललितभाई शहा, सचिव श्री. रमेश बियाणी, संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी, सहसचिव श्री. अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष श्री संजय बोरा, महाविद्यालय विकास समितीचे ॲड. आशिष बाजपाई, ॲड. श्रीकांत उटगे, बार कौन्सिल ऑफ गोवा व महाराष्ट्राचे ॲड. जयंत जायभावे आणि ॲड. व्हि. डि. साळुंके तसेच लातूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. शिवकुमार जाधव, सचिव ॲड. गुरुप्रसाद येरटे, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूनम नाथानी उपस्थित होते.

# दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव आदरणीय श्री. रमेशजी बियाणी यांचे दयानंद कला महाविद्यालयातर्फे अभिष्टचिंतन




दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री. लक्ष्मीरमण लाहोटी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांच्या प्रमुख उपस्थितीत, लातूरच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्राला नवसंजीवनी देणारे दूरदृष्टीचे नेतृत्व व दयानंद शिक्षण संस्थेचे कार्यतत्पर सचिव आदरणीय श्री. रमेशजी बियाणी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने अतिशय उत्साही आणि मंगलमय वातावरणात 'अभिष्टचिंतन सोहळा' पार पडला.

श्री. रमेशजी बियाणी यांनी शिक्षण आणि समाजकारणालाच आपल्या जीवनाचे ध्येय मानले आहे. सन २००६ पासून दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव म्हणून धुरा सांभाळताना, प्रसिद्ध 'लातूर पॅटर्न' निर्माण करणाऱ्या या संस्थेच्या सर्वांगीण विकासात आणि प्रगतीत त्यांनी मार्गदर्शकाची अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे.

विद्यार्थ्यांना आधुनिक व रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी फार्मसी, आर्किटेक्चर, फॅशन डिझाईन, ॲनिमेशन, इंटेरियर डिझाईन, प्रशासकीय सेवा, विधी शिक्षण आणि संगीत यांसारखे नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू केले; ज्यामुळे आज हजारो विद्यार्थी स्वावलंबी बनले आहेत. त्यांच्याच नेतृत्वात महाराष्ट्रात सर्वप्रथम ऑनलाईन शिक्षणाची यशस्वी सुरुवात झाली. संस्थेत 'अकॅडमिक कौन्सिल' आणि 'फॅकल्टी एक्सचेंज' यांसारखे उपक्रम राबवून त्यांनी प्रत्येक वर्गात 'डिजिटल बोर्ड'ची अत्याधुनिक संकल्पना प्रत्यक्षात आणली. यासोबतच 'लातूर-२०४७' हा दूरदर्शी उपक्रम राबवून त्यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात व्यापक विचारमंथन घडवून आणले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, विशेषतः 'नीट', 'जेईई' व 'आयआयटी' यांसारख्या स्पर्धा व व्यावसायिक परीक्षांच्या तयारीसाठी ते सातत्याने मार्गदर्शन व सक्रिय सहभाग नोंदवत असतात. संस्थेच्या विविध परीक्षा व उपक्रम सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने पार पडावेत, यासाठी ते प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधून आवश्यक त्या सूचना देतात.

केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत २०१६ च्या भीषण पाणीटंचाईच्या काळात संस्थेतर्फे मोफत पाणीपुरवठा, तसेच कोविड-१९ च्या काळात मास्क, सॅनिटायझर आणि अन्नधान्य वाटप करून त्यांनी समाजाला मोठा आधार दिला. विद्यार्थ्यांचे वसतिगृह, स्वच्छता, सुरक्षा, गुणवत्तेचा दर्जा आणि वृक्षसंवर्धन अशा प्रत्येक बाबीवर त्यांचे वैयक्तिक लक्ष असते.

दयानंद शिक्षण संस्थेचे मुख्य आधारस्तंभ आणि शिल्पकार आदरणीय श्री. रमेशजी बियाणी साहेब यांच्या दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्यासाठी दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

या अभिष्टचिंतन सोहळ्यास शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांच्यासह दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, स्टाफ सचिव प्रा. सुरेश क्षीरसागर व कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैचारिक प्रदूषण हीच सर्व प्रदूषणांची मूळ समस्या : न्यायमूर्ती अभय ओक

ध्वनी, जल आणि वायू प्रदूषणासोबतच समाजात वैचारिक प्रदूषणाचा प्रकार वाढीस लागला असून, हेच वैचारिक प्रदूषण सर्व प्रकारच्या नैसर्गिक प्रदूषणांचे मुख्य मूळ आहे, असे परखड मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी व्यक्त केले. दयानंद विधी महाविद्यालय लातूर आणि लातूर जिल्हा बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "न्यायसंवाद: कायदा, पर्यावरण आणि नागरिक" या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी उपस्थित होते, तर मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश व महाराष्ट्र शासकीय न्यायाधिकरण (मुंबई) चे अध्यक्ष न्यायमूर्ती मंगेश पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी मंचावर आंतरराष्ट्रीय पर्यावरण तज्ज्ञ अतुल देऊळगावकर, दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ललितभाई शहा, सचिव रमेश बियाणी, दयानंद विधी महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड. आशिष बाजपाइ, ॲड. श्रीकांत उटगे, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे ॲड. जयंत जायभावे, ॲड. व्ही. डी. साळुंके, लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. शिवकुमार जाधव, सचिव ॲड. गुरुप्रसाद येरटे व प्राचार्य डॉ. पूनम नाथानी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना न्यायमूर्ती अभय ओक म्हणाले की, प्रदूषण विरहित वातावरणात राहण्याचा घटनात्मक अधिकार सर्वांना असताना देखील आपण प्रदूषणा सह जगत आहोत; कारण कर्तव्याची नसलेली जाणीव, निसर्गाप्रती बोथट भावना, कायदा पालनाविषयीची उदासीनता, सामाजिक व राजकीय निष्क्रियता ही सर्व वैचारिक प्रदूषणाचीच लक्षणे आहेत. त्यामुळे नागरिकांनी स्वतःपासून सुरुवात केली तर पर्यावरण संवर्धनास वेळ लागणार नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनच पर्यावरणाचा ऱ्हास कमी करण्यास मदत करू शकतो, कारण धर्म व विज्ञानाची गल्लत न करता साजरे केले जाणारे सण व उत्सव हे पर्यावरणाची हानी टाळतात. धार्मिक उत्सव व मिरवणुकांमध्ये डीजे, फटाके आणि बेकायदेशीर बॅनरचा वारेमाप वापर टाळून प्रत्येकाने वैयक्तिक निर्बंध ठेवणे गरजेचे आहे. पर्यावरण संस्कारांचे काम शालेय जीवनापासून झाले पाहिजे. 'वृक्ष हे पर्यावरणाचे सैनिक आहेत' ही भावना बालमनात रुजली की पर्यावरणाचा ऱ्हास थांबेल, म्हणूनच लातूरकरांनी पर्यावरणाचा विशेष 'लातूर पॅटर्न' निर्माण करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले






# तिरंगा पदयात्रेत दयानंद कला महाविद्यालयाचा उत्स्फूर्त सहभाग

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित तिरंगा पदयात्रेत दयानंद कला महाविद्यालयाच्या १०८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हातात अभिमानाने तिरंगा ध्वज घेतलेल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत तसेच ढोल-ताशांच्या गजरात पदयात्रेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले.

या तिरंगा पदयात्रेला जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील व जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद मुख्याधिकारी राहुलकुमार  मीना, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) रोहिणी कुंभार, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) संजय क्षीरसागर, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) बी. के.हस्मी तसेच उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) सुशील फुलारी, आणि मधुकर ढमाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

पदयात्रेदरम्यान विद्यार्थ्यांनी तिरंगा ध्वज हातात घेऊन 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. ढोल-ताशांच्या गजरामुळे पदयात्रेतील उत्साहात आणखी भर पडली. विद्यार्थ्यांचा शिस्तबद्ध सहभाग आणि देशप्रेमाची भावना यामुळे पदयात्रेला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ अंजली जोशी,  डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकीची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना पदयात्रेत सहभागी करून घेण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. संदीपान जगदाळे यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा सहभाग नियोजित करण्यात आला. कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल भुरे, प्रा. सिद्धार्थ भालेराव, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. जिगाजी बुद्रुके, प्रा. दशरथ ननावरे, प्रा. महेश जंगापल्ले आणि प्रा. रत्नाकर केंद्रे यांची यावेळी उपस्थिती होती. शिक्षक व विद्यार्थ्यांनी पदयात्रेचे शिस्तबद्ध नियोजन आणि यशस्वी सहभागासाठी विशेष परिश्रम घेतले.

१०८ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, हातातील तिरंगा, देशभक्तीपर घोषणा आणि ढोल-ताशांचा गजर यामुळे दयानंद कला महाविद्यालयाचा सहभाग लक्षवेधी ठरला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित या तिरंगा पदयात्रेतून विद्यार्थ्यांनी देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश दिला.



# दयानंद कला महाविद्यालयात रॉबिन हूड आर्मीच्या ‘Learn India’ उपक्रमाचे भव्य उद्घाटन!

सामाजिक जाणीव आणि शैक्षणिक क्रांतीचा सुरेख संगम साधत रॉबिन हूड आर्मी लातूर, इनरव्हील क्लब एरिया २४ लातूर आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने ‘Learn India’ या शैक्षणिक उपक्रमाचा भव्य शुभारंभ दयानंद कला महाविद्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. सदर उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी रॉबिन हूड आर्मीच्या कार्याचे कौतुक करत हा उपक्रम अत्यंत सुंदर, स्तुत्य आणि समाजोपयोगी असल्याचे सांगितले. "आजच्या सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षण रुजविणे हे एक मोठे आव्हान आहे. विद्यार्थ्यांनी केवळ किताबी ज्ञानावर न थांबता सामाजिक बांधिलकी जपत चांगल्या मूल्यांची जपणूक करावी," असे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन आपले विचार मांडले पाहिजेत, असा मोलाचा सल्ला देत त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यानंतर इनरव्हील क्लब एरिया २४ च्या अध्यक्षा डॉ. दुर्गा शर्मा यांनी प्रास्ताविकातून क्लबच्या विविध सेवाभावी उपक्रमांची माहिती दिली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित व गरजू घटकांना सक्षम करण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच डॉ. उर्वी नागुरे यांनी रॉबिन हूड आर्मीच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे, गरजू विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे, वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे या मुख्य उद्देशाने ‘Learn India’ उपक्रमांतर्गत विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जाणार आहेत.

उपस्थित सर्व मान्यवरांनी शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित करत या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. ‘Learn India’ मुळे अनेक गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा सार्थ विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाला इनरव्हील क्लबच्या सौ. स्वर्णिमा कोचेटा, रॉबिन हूड आर्मीचे डॉ. उर्वी नागुरे, नंदन भुतडा, संगमेश येवंगे, डॉ. रामेश्वर धानुरे, नवनाथ खांडेकर, पवन भोसले, सोहम, हर्षा, सानिया, श्वेता, वल्लभ, रोहन व सुनील, तसेच दयानंद कला महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सदस्य, स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# अंध विद्यार्थ्यांना जीवन जगण्याचा प्रकाश दाखवणारे ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान

दयानंद कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान, बुधोडा येथे क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना यासाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान येथे प्रकल्प समन्वयक श्री आकाश कांबळे आणि पंचशीला डावखरे यांनी दिव्यांग पुनर्वसनासंबंधी विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची माहिती दिली. समाजशास्त्र विभाग प्रमुख आणि महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी यांनी याप्रसंगी बोलताना ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान च्या कार्याचे आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे तसेच परिश्रमांचे कौतुक केले. अंध लोकांना समाजामध्ये जीवन जगताना असंख्य समस्या येतात. त्यांना स्वबळावर जीवन जगता यावे या दृष्टिकोनातून ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान यांनी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण अंध व्यक्तींना देऊन त्यांना जीवन जगणे सुलभ केले आहे. अंध विद्यार्थी प्रशिक्षणानंतर मोबाईलचा सर्रास वापर करू शकतात, विविध ठिकाणी सराईतपणे प्रवास करू शकतात, आपले आयुष्य समाधानाने जगू शकतात, ही जाणीव त्यांना ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानने दिली आहे. अशीच जाणीव विद्यार्थ्यांनीही दिव्यांग जनांबद्दल बाळगावी असे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

या क्षेत्रभेटीचे आयोजक प्रा. संजय स्वामी यांनी ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. तसेच क्षेत्रभेटीमध्ये विद्यार्थ्यांनी या प्रकल्पाकडे कसे बघावे, तथ्यांची नोंद कशी करावी, रिपोर्ट रायटिंग कसे करावे याविषयीही मार्गदर्शन केले. ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान ही बुधोडा ता. औसा जि. लातूर येथे 1981 पासून स्थापन झालेली दिव्यांग पुनर्वसन प्रशिक्षण संस्था आहे. येथे अंध विद्यार्थ्यांना मसाज करणे, निसर्गोपचार, दीप तयार करणे, ग्राफिक्स डिझाईन करणे अशा विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असून प्रशिक्षणानंतर विद्यार्थी स्वतंत्रपणे या कौशल्याचा वापर करून स्वावलंबी बनतात.अनेक विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासाठी विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात. आजपर्यंत असंख्य विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी संवाद साधताना अनेक प्रश्न उपस्थित केले आणि समाधानकारक उत्तरे प्राप्त केली. या क्षेत्रभेटीसाठी प्रा. ज्योती कदम, प्रा. गायत्री वळसंगेकर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# खेलो इंडिया संवाद कार्यक्रम संपन्न

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिवस 2026 चे औचित्य साधून खेलो इंडिया संवाद कार्यक्रमाचे आयोजन दयानंद कला महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम देशभरामध्ये भारत सरकार युवा कार्य एंव खेल मंत्रालय यांच्या आदेशान्वये भारतातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयात राबविण्यात आला. यामध्ये जिल्ह्यातून फक्त दोन महाविद्यालयातून राबविण्यात यावा असे आदेश युवा कार्य व खेल मंत्रालयाकडून देण्यात आले होते. त्यासाठी दयानंद कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची निवड करण्यात आली होती. या कार्यक्रमात आभासी पद्धतीने भारताचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या भाषणातून देशातील क्रीडा परिसंस्था, ऑलम्पीक खेळ, भारतातील खेळाडूसाठी सुविधा यावर चर्चा केली. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय स्तरावर खेळात योगदान असलेले विद्यार्थी यांना आमंत्रित करण्यात आले होते. स्थानिक खेळाडू निवृत्त उपनिरीक्षक रहेमान सय्यद यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमास आकाश गौंड, गोविंदा महाजन, अक्षता आडे या खेळाडूंनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी यांच्या उपस्थित करण्यात आले. या प्रसंगी प्रा.डॉ.नितेश स्वामी, प्रा.राजकुमार मोरे, श्री. मंगेश चिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.डॉ. सुभाष कदम

यांनी प्रास्ताविक केले तर सुत्रसंचालन श्री.ओमकार सुरवसे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. राजकुमार मोरे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



# मासिक ई-मॅगझीन

## महिना : ऑगस्ट २०२६


**संपर्क**

**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**

**ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org**



**आभार**

**या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.**